## आजचा शुभ विचार

"नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वतःच्या ताकदीवर विश्वास ठेवा."आपण जे करतोय किंवा आपल्यात जी ताकद आहे ती ओळखायला शिका. नशिबावर निर्भर राहू नका.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर



RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!




चला तर आपल्या सेवेत आम्ही आहोत

जेव्हा गरज असेल प्रसिद्धीची किंवा आपल्या व्यवसायाला चालना देण्याची

दैनिक स्वराज्यदूत आपल्या पाठीशी आहे

आम्ही देत आहोत आपल्याला जलद गतीने प्रसिद्धीसाठी छापील वृत्तपत्र आणि इ पेपर मध्ये जाहिरातीचा पर्याय

कोणतीही जाहिरात प्रसिद्ध केली जाईल.

संपर्क -मो. ८४४६६ ७३६७७

स्वराज्यदूत NEWS MEDIA CHANNEL

वेबसाईट ला भेट द्या www.swarajyadoot.com



मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते



DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-55 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Thuseday 01 July 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ५५ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ मंगळवार, दि. ०१ जुलै २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये


## गोपीचंद पडळकर यांच्या विरोधात ख्रिश्चन समाजाचा आक्रोश मोर्चा

जालना प्रतिनिधी

दैनिक स्वराज्यदूत

-------------------------------



भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी ख्रिश्चन धर्मगुरुंच्या विरोधात केलेल्या वादग्रस्त वक्तव्याचे पडसाद सोमवारी जालना शहरात उमटले. सकल ख्रिश्चन समाजाच्या वतीने आमदार पडळकर यांच्या विरोधात जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

गांधी चौकातून निघालेल्या या मोर्चात ख्रिश्चन समाज बांधव सहभागी झाले होते. मोर्चाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. ऋतुजा राजगे आत्महत्या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करावी, याप्रकरणी ख्रिश्चन धर्मगुरू तसेच समाजाविरुद्ध वक्तव्ये करणाऱ्या आमदार गोपीचंद पडळकर यांची पक्षातून हकालपट्टी करावी, अशी मागणी या निवेदनाच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली.

ख्रिश्चन समाजाशी संबंध नसलेल्या ऋतुजा राजगे यांच्या आत्महत्येचा संबंध जोडून आमदार पडळकर यांनी ख्रिश्चन समाजाची बदनामी केली असून, त्यांना वेळीच लगाम घालण्याची मागणी मोर्चाच्या वतीने करण्यात आली. पडळकर यांनी केवळ ख्रिश्चन समाजाच्या भावनाच दुखावलेल्या नाहीत तर त्यांच्या वक्तव्यांमुळे समाजातील शांतता आणि लोकशाही मूल्यांवर आघात झाला असल्याने त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. वैभव उगले, लालबहादूर कांबळे, चंद्रसेन निर्मल, डी. वाय. भालेराव, रविकांत दानम, अनिल साठे, दीपक केदार आदींनी मोर्चाचे नेतृत्व केले. खासदार डॉ. कल्याण काळे, माजी आमदार कैलास गोरंट्याल आदींची भाषणे मोर्चासमोर झाली. जालना शहर कॉंग्रेस अध्यक्ष शेख महेमूद, शिवराज जाधव आदींची उपस्थिती यावेळी होती.


अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या

दैनिक स्वराज्यदूत

या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी

आजच संपर्क करा ८४४६६७३६७७



महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

स्वराज्यदूत गौरव पुरस्कार

कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!



महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

कौतुक तुमच्या कार्याचे

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!

SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

### प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत dainikswarajyadoot@gmail.com या इ-मेल वर पाठवायचा आहे.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.

8446673677 / 8010232449


## सोनमचा लॅपटॉप आणि दागिने सापडले, राजा रघुवंशी हत्या प्रकरणी पोलिसांच्या हाती महत्त्वाचे पुरावे

विशेष प्रतिनिधी

दैनिक स्वराज्यदूत

----------------------






मधुचंद्राला गेलेले राजा रघुवंशी आणि त्याची पत्नी सोनम हे दोघेही बेपत्ता झाले ही बातमी मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात आली होती. त्यांची शोध मोहीम सुरु होती. मात्र २ जून रोजी राजाचा मृतदेह पोलिसांना सापडला. त्यानंतर ८ जून रोजी जेव्हा सोनम पोलिसांना शरण आली तेव्हा सोनमनेच सुपारी किलर्सच्या मदतीने राजाची हत्या घडवून आणल्याचं पोलिसांना सांगितलं. या कटात तिचा प्रियकर राज कुशवाहाही सहभागी होता.

मेघालय पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार राजा रघुवंशी हत्या प्रकरणात त्यांना आता सोनमचा लॅपटॉप आणि तिने बरोबर घेतलेले दागिने मिळाले आहेत. राजा रघुवंशीच्या गळ्यात हनिमूनला गेलेला असताना जी सोन्याची साखळी होती ती सोनमने काढून घेतली होती. ती सोनसाखळी विशेष तपास पथकाने जप्त केली आहे. तसंच सोनम रघुवंशीचा लॅपटॉप आणि काही महत्त्वाची कागदपत्रं पोलिसांना सापडली आहे. सिलोम जेम्सच्या घरावर जेव्हा पोलिसांनी छापा मारला तेव्हा त्यांना ही कागदपत्रं आणि इतर पुरावे सापडले आहेत. इस्ट खासी हिल्सचे पोलीस अधीक्षक विवेक सैय्याम यांनी दिलेल्या माहितीनुसार २३ मे रोजी राजा रघुवंशीची सोनम आणि तिचा प्रियकर राज कुशवाहा यांनी सुपारी किलर्सकडून हत्या घडवून आणली. राजाचा मृतदेह २ जून रोजी पोलिसांना आढळून आला. मात्र सोनम रघुवंशी तरीही बेपत्ता होती. सुरुवातीला पोलिसांना हे लूट आणि अपहरण याचं प्रकरण वाटलं होतं. मात्र पोलिसांनी जेव्हा सोनम रघुवंशीचे फोन रेकॉर्ड तपासले तेव्हा राज कुशवाहाशी ती सातत्याने संपर्कात होती हे कळलं. पोलिसांनी राज कुशवाहाला अटक केली. त्यानंतर ८ जून रोजी सोनम पोलिसांना शरण आली. २३ मे रोजी राजा आणि सोनम हे दोघंही शिपारा होम स्टे या ठिकाणी आले. पहाटे ५ वाजून ३० मिनिटांनी या दोघांनी चेक इन केलं. त्यानंतर सहा वाजण्याच्या सुमारास राजा आणि सोनम हे दोघंही ट्रेकला जाण्यासाठी तयार झाले. याचवेळी सोनमने ज्या तिघांना राजाच्या हत्येची सुपारी दिली होती ते तिघेही जवळच्या एका होम स्टेमध्ये राहिले होते. साधारण १० वाजण्याच्या सुमारास सोनम आणि राजाने ट्रेक करत असताना २ हजार पायऱ्यांचं अंतर पार केलं. त्याआधी त्यांची भेट आनंद, आकाश आणि विशाल यांच्याशी झाली होती. साधारण १० वाजण्याच्या सुमारास राजा, सोनम, आकाश, विशाल आणि आनंद या पाचही जणांना अल्बर्ट या टुरिस्ट गाईडने पाहिलं होतं. अल्बर्टने दिलेल्या जबाबामुळेच सोनमच यामागे असावी हे पोलिसांच्या लक्षात आलं आणि त्या अनुषंगाने त्यांनी तपासाची चक्रं फिरवली. या टुरिस्ट गाईने दिलेल्या माहितीनुसार सोनम या चार जणांच्या मागून चालत होती तर तिच्या चालण्याचा वेग थोडा मंदावला होता. दुपारी १२.३० च्या दरम्यान सोनमने राजाची आई उमा रघुवंशी यांना फोन केला. मी खूपच दमले आहे आणि उपास ठेवला आहे असं तिने सासूला म्हणजेच राजाच्या आईला सांगितलं. त्यावेळी उमा रघुवंशी राजाशीही बोलल्या. राजाशी हा आपला शेवटचा संवाद आहे हे तेव्हा त्यांना मुळीच वाटलं नव्हतं. साधारण आणखी अर्ध्या तासाने दुपारी १ ते १.३० च्या सुमारास हे पाचही जण मावलखियाट या ठिकाणाहून वेई सावदोंग धबधब्याच्या दिशेने निघाला. त्यावेळी सोनलने या तिघांना इशारा केला ज्यानंतर राजाच्या डोक्यावर चाकू हल्ला करण्यात आला. राजाची हत्या करण्यात आली तेव्हा सोनम तिथेच उपस्थित होती. राजाच्या हत्येनंतर सोनमने राजाच्या मोबाइलवरुन सात जन्मो का साथ असं लिहून एक सोशल मीडिया पोस्ट केली. दुपारी २.३० च्या दरम्यान राजाचा मृतदेह दरीत फेकण्यात आला. असा घटनाक्रम राजाच्या मृत्यू आधी घडला.

## पाकिस्तानातील हिंदू जोडप्याचा तहानेने तडफडून मृत्यू; भारतात कायमचं स्थायिक होण्यासाठी सोडला होता देश

विशेष वृत्तसेवा

दैनिक स्वराज्यदूत

--------------------------



राजस्थानच्या जैसलमेर जवळ असलेल्या भारत आणि पाकिस्तान सीमारेषे जवळ दोन मृतदेह आढळून आले. हे दोघंही पाकिस्तानात राहणारं हिंदू दाम्पत्य होतं. भारतात यायचं म्हणून त्यांनी बेकायदेशीर रित्या सीमारेषा ओलांडली खरी. पण तहान आणि शरीरातील पाण्याचं प्रमाण कमी झाल्याने या दोघांचा मृत्यू झाला. रवि कुमार (वय १७) आणि शांती बाई अशी मृत्यू झालेल्या पाकिस्तानातील दोन हिंदूंची नावं आहेत. भारतात हे दोघंही बेकायदेशीररित्या आले होते. जैसलमेरचे पोलीस अधीक्षक सुधीर चौधरी यांनी ही माहिती दिली की भारत आणि पाकिस्तान सीमा रेषेजवळ आम्हाला दाम्पत्याचे मृतदेह आढळून आले. या दोघांचाही मृत्यू तहान आणि भूक या दोन्हीमुळे तडफडून झाल्याची चिन्हं दिसत आहेत. या दोघांचा मृत्यू जिथे झाला तिथे पोलिसांना एक रिकामी कॅन आढळली. पोलिसांना वाटतं आहे की तहान आणि उन सहन न झाल्याने या दोघांचा मृत्यू झाला असावा.

१७ वर्षीय रवी आणि त्याची पत्नी शांती हे दोघंही पाकिस्तानच्या सिंध प्रांतातील घोटकी जिल्ह्यात असलेल्या मीरपूर या गावाचे रहिवासी होते. चार महिन्यांपूर्वीच या दोघांचं लग्न झालं होतं. पाकिस्तानच्या या जोडप्याने आपण आता लग्नानंतर चांगलं आणि स्थैर्य असलेलं आयुष्य सुरु करु हा विचार करुन या दोघांनी पाकिस्तान सोडून भारतात येण्याचा निर्णय घेतला होता. भारतात हे दोघं बेकायदेशीर पद्धतीने सीमा ओलांडून दाखलही झाले. भारतात येण्यासाठी त्यांनी कायदेशीर मार्ग निवडला होता. पण भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांमध्ये तणाव सुरु झाल्याने या दोघांना व्हिसा नाकारण्यात आला. ज्यानंतर या दोघांनी बेकायदेशीर रित्या भारतात प्रवेश केला होता. टाइम्स ऑफ इंडियाने हे वृत्त दिलं आहे. पाकिस्तानच्या या जोडप्याने बेकायदेशीर रित्या सीमा ओलांडण्याचा निर्णय घेतला. ज्यावरुन रवी आणि त्याच्या वडिलांचा बराच वाद झाला. तुम्ही दोघंही असा काही निर्णय घेऊ नका अशी ताकीदही रवीच्या वडिलांनी त्याला दिली होती. पण त्यानंतर आठवड्याभरात हे दोघं सीमा रेषा ओलांडून पाकिस्तानातून भारतात आले. रवी आणि शांती दोघंही भारतात आल्यानंतर ते वाळवंटात रस्ता चुकले. त्यामुळे या दोघांनाही प्रचंड प्रमाणात तहान लागली आणि ते दोघंही कासावीस लागले. तहान आणि उन्हामुळेए आलेली अस्वस्थता यामुळे या दोघांचा जीव गेला. या दोघांचे मृतदेह २८ जून रोजी सापडले. २९ जूनला या मृतदेहांचं शवविच्छेदन करण्यात आलं. या मृतदेहांसह पाकिस्तानची कागदपत्रं सापडली आहेत. ज्यामध्ये या दोघांचे तपशील आहेत. पाकिस्तान विस्थापित युनियन आणि बॉर्डर पीपल या संस्थेचे जिल्हा समन्वयक दिलीप सिंह ओढा म्हणाले जर या दोघांचे नातेवाईक त्यांचे मृतदेह घेण्यास तयार असतील तर आम्ही ते त्यांना सोपवू इच्छितो. तसंच जर हे मृतदेह पाकिस्तानला पाठवले गेले नाहीत तर आम्ही त्यावर हिंदू पद्धतीने अंत्यसंस्कार करु अशीही माहिती त्यांनी दिली आहे.

संपादकीय

# भय इथले संपत नाही...

कोलकाता येथे २०२४ मध्ये आर जी कार मेडिकल कॉलेज बलात्काराच्या घटनेने देश हादरून गेला होता. आज २०२५ रोजी कोलकात्याच्या लॉ कॉलेजच्या पहिल्या वर्षाच्या विद्यार्थिनीवर तिघा जणांनी अत्याचार केल्याची घटना घडली आहे. त्यामुळे देशात संतापाची लाट उसळली आहे. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांचे सरकार आहे आणि एक महिला मुख्यमंत्री असतानाही अशा घटनांना रोखू शकत नाहीत हे भीषण वास्तव समोर आले आहे. कोलकाता, बिहार, पंजाब आणि हरियाणा येथील अशा अत्याचाराच्या घटना खूपच अस्वस्थ करणाऱ्या आहेत हे तर सत्य आहेच, पण येथे कायदा आणि सुव्यवस्था नाममात्रही अस्तित्वात नाही याची चिंता वाटते. कारण दररोज गुंड बंदुकीच्या जोरावर तरुणींवर अत्याचार करत आहेत आणि कायद्याचा खून पाडत आहेत हे वास्तव आहे.

२०१२ च्या दिल्लीतील सामूहिक अत्याचाराच्या घटनेमुळे देश पेटून उठला आणि त्याच आगीत मनमोहन सरकारची आहुती पडली. कारण ते सरकार कुचकामाचे होते. त्या प्रकरणानंतर स्थापन झालेल्या न्यायमूर्ती वर्मा समितीने अनेक शिफारशी केल्या आणि त्याची अंमलबजावणी झाली, पण गुन्हेगारांना कायद्याचा धाक बसू शकलेला नाही हे वास्तव आहे. कोलकाता येथील लॉ कॉलेजच्या विद्यार्थिनीवर बलात्कार झाला त्याची कहाणी अंगावर काटा आणणारी आहे. तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आले आणि यात तिघे जण होते. यातील आरोपी मनोजित मिश्रा हा ३१ वर्षीय, तर दुसरा आरोपी झैब अहमद हा २१ वर्षीय आणि २० वर्षीय प्रमित मुखर्जी हे पीडितेच्या वर्गातीलच होते. तिच्या बलात्काराच्या घटनेचे शॉकिंग माहिती समोर आली आहे आणि त्यानुसार २४ वर्षीय ही विद्यार्थिनी कॉलेजच्या आवारात २५ जूनला असताना सायंकाळी ७.३० ते रात्री १०.३० वाजेपर्यंत तिच्यावर अत्याचार सुरू होते. आरोपींनी अत्याचाराचे फिल्मिंगही केले आणि तिला असे सांगून धमकावले की, जर तिने या गोष्टीची जाहीर वाच्यता केली, तर ते हा व्हीडिओ सर्वत्र व्हायरल करतील. ममता बॅनर्जी या पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आहे. पण त्या आपल्या राज्यातील अत्याचाराच्या घटनांना आळा घालू शकल्या नाहीत. उलट मोदी सरकारवर रोज त्या नवनवीन आरोप करत आहेत. संबित पात्रा यांनी राज्य सरकारवर आरोप केला आहे की, राज्य सरकार पुरस्कृत हा बलात्कार आहे आणि त्यासाठी राज्य सरकारला कठोर शिक्षा झाली पाहिजे. कारण कोणत्या पक्षाचे सरकार हे महत्त्वाचे नाही, तर एका स्त्रीची अब्रू गेली आहे आणि त्यामुळे गुन्हेगारांना कठोरातील कठोर शिक्षा झाली पाहिजे. पण आपल्याकडे तितकी परिपक्व व्यवस्था नाही. त्यामुळे आरोपी कोणत्या पक्षाचा आहे आणि त्याने केलेला गुन्हा किती गंभीर आहे हे अगोदर पाहिले जाते.

आरोपींनी या मुलीवर नृशंस अत्याचार केलेच पण फोर्सफूल पेनेट्रेशन म्हणजे डॉक्टरी भाषेत ज्याला जबरदस्तीने बळजबरी करणे असे म्हटले जाते. हे चालू असताना ती मुलगी असहाय्य किंकाळ्या फोडत होती. आता या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एसआयटी स्थापन झाली आहे आणि तपास लगेच सुरू झाला आहे, पण आरोपींना कितपत शिक्षा होईल हा वादाचा प्रश्न आहे. कारण आरोपी जरी वरच्या वर्गातील नसले तरीही सरकार ममता दीदींचे आहे आणि ते अशा अनेक गुन्हेगारांना पाठीशी घालत असते हा इतिहास आहे. त्यातील एक आरोपी हा तृणमूल काँग्रेसचा पदाधिकारी आहे. त्यामुळे त्याला वाचवले जाणार हे स्पष्ट आहे. गेल्या काही वर्षांपासून कोलकात्यात अशा घटनांमध्ये दुप्पट वाढ झाली आहे. विनयभंगाच्या घटनांमध्ये तिप्पट वाढ झाली आहे. ही आकडेवारी उगीचच म्हणून घुसडण्यात आली नाही, तर नॅशनल क्राईम ब्युरोने दिली आहे. गेल्या एनसीआरबीच्या अभ्यासात बंगालला महिलांवरील अत्याचाराच्या बाबतीत पहिल्या क्रमांकाचे राज्य ठरवले आहे. ही बाब कोणत्याही सरकारसाठी भूषणावह नाही आणि ज्या राज्याच्या मुख्यमंत्री महिला आहे त्या राज्याला तर अजिबातच शोभणारी नाही. पण हे वास्तव आहे.

२०१२ मध्ये निर्भया बलात्कार प्रकरण घडले, पण त्यापासून बंगालने काहीही धडा शिकलेला नाही हे सीआयडी अधिकारी सांगतात हे सत्यच आहे. देशात स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये घट होत असताना मात्र बंगालमध्ये आणि कोलकात्यात त्या घटना जास्त वाढल्या आहेत आणि हुंडाबळीच्या प्रथा नष्ट तर झालेली नाहीच, पण जास्तच ती गडदपणे प्रकाशित झाली आहे. आरोपींना शिक्षा होईल का ते माहीत नाही. कारण आपले कायदे गुन्हेगारांना सर्वप्रकारची मदत करणारे आहे. त्यामुळे आंध्र प्रदेशात दोन वर्षांपूर्वी एका बलात्कारातील आरोपीला पोलिसांनी सपवले होते. त्यावर बराच बवाल झाला होता, पण त्यातील दिलासादायक बाब अशी की अनेकांनी पोलिसांच्या त्या कृत्याचे समर्थनही केले होते. यात आरोपी सत्ताधारी पक्षाचे असल्याने त्यांना शिक्षा होईल याची हमी नाही. शिवाय आरोपींची पोहोच फार वरच्या वर्तुळात असली तर ते निर्दोष सुटण्याची शक्यताच जास्त.

कोलकाता येथील लॉ कॉलेजची विद्यार्थिनी किती आशा, आकांक्षा घेऊन कॉलेजमध्ये आली असेल. तिची स्वप्ने किती असतील, त्या स्वप्नांना चूड लावण्याचे पाप बंगाल सरकारने केले आहे. ममता बॅनर्जी यांनी राजीनामा देण्याची मागणी होईल आणि त्या काही तसे करणार नाहीत, पण गुन्हेगारांना त्यांचे सरकार तारणहार ठरले आहे. हा काळा डाग त्या पुसून टाकू शकत नाहीत. भारतात पितृसत्ताक पद्धत टिकून आहे आणि ती नष्ट होईपर्यंत बलात्काराच्या घटना कधीच नष्ट होणार नाही. राजकारण, कारस्थान आणि कट प्रत्येक गुन्ह्याभोवती दिवसेंदिवस वाढत असतो आणि त्या परिस्थितीत पीडितेच्या कुटुंबाला न्याय मिळत नाही अशी देशात स्थिती आहे. प्रत्येक घटनेनंतर मूक मोर्चा, कँडल मोर्चा असे प्रकार घडतात. पण गुन्हेगार मोकाट सुटतात. लॉ कॉलेजच्या या घटनेबद्दल असे काही होऊ नये इतकीच इच्छा आहे.

## नांदेड जिल्ह्यात पवित्र ग्रंथांचे भव्य वितरण "सतगुरु सेवा और बंदगी फिर मिलन की नाही "

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-------------------------



संत रामपालजी महाराज लिखित 'ज्ञानगंगा' आणि 'जगण्याचा मार्ग' या अमूल्य ग्रंथांचा लोकांपर्यंत प्रसार नांदेड़, महाराष्ट्र दि. २९ जून २०२५ रोजी नांदेड़ जिल्ह्यातील १६ तालुक्यात गावो गावी विशेष कार्यक्रमात संत रामपालजी महाराज लिखित 'ज्ञानगंगा' आणि 'जगण्याचा मार्ग' या शास्त्राधारित पवित्र ग्रंथांचे भव्य प्रमाणात वितरण करण्यात आले. या ग्रंथांचे वितरण हा केवळ पुस्तक वाटपाचा कार्यक्रम नव्हता, तर समाजपरिवर्तनाचा एक महान उपक्रम ठरला. या पवित्र ग्रंथांमधून संत रामपालजी महाराजांनी अत्यंत सुलभ व साध्या भाषेत समजावून सांगितले आहे की: मानवी जीवनाचा खरा उद्देश काय आहे, नशा, व्यसन, विकार यांपासून दूर रहात खरे आध्यात्मिक जीवन कसे जगावे, आणि सर्व धर्मातील एकसंध सत्याची ओळख कशी करून घ्यावी. शास्त्राधारित आध्यात्माचा संदेश या दोन्ही ग्रंथांचे वैशिष्ट्य म्हणजे ते सर्व प्रमुख धर्मग्रंथांवर आधारित आहेत वेद, गीता, कुराण, बायबल व गुरुग्रंथसाहिब यांच्या प्रमाणित शास्त्रयुक्त आधाराने यामध्ये मार्गदर्शन दिले आहे. त्यामुळे कुठलाही मतभेद न करता, सर्व धर्मीयांना एकत्र आणण्याचे सामर्थ्य या ग्रंथांमध्ये आहे. तरुणाईसाठी एक नवा आशेचा किरण आजच्या काळात तरुण पिढी नशा, व्यसन, वाईट संगत, आणि अनैतिकतेच्या विळख्यात अडकताना दिसते. अशा परिस्थितीत, 'ज्ञानगंगा' आणि 'जगण्याचा मार्ग' हे ग्रंथ त्यांच्या जीवनाला योग्य दिशा देऊ शकतात. या ग्रंथांचा अभ्यास केल्याने: जीवनात संयम, सदाचार आणि शुद्ध विचार येतात, कुटुंब, समाज आणि राष्ट्र मजबूत बनते, सर्वांगीण आध्यात्मिक उन्नती साधता येते. समाज परिवर्तनासाठी एक प्रेरणादायी पाऊल संत रामपालजी महाराजांचे हे कार्य केवळ आध्यात्मिक नव्हे, तर सामाजिक जागृतीचेही आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात जिथे माणूस भ्रमित झाला आहे, तिथे सत्याचा मार्ग दाखवणे ही काळाची गरज आहे. या ग्रंथांचे वाचन आणि आचरण केल्याने माणसाचे जीवन नशामुक्त, विकारमुक्त आणि व्यभिचारमुक्त होऊन, तो खऱ्या अर्थाने सुखी व समाधानी बनू शकतो. आज प्रत्येक व्यक्तीने या पवित्र ग्रंथांचा अभ्यास करून आपले जीवन उज्वल करावे, ही काळाची गरज आहे. कारण शुद्ध विचारांची सुरुवात म्हणजेच एक नवे युग निर्माण होण्याची नांदी आहे. "सत्याचे वाचन करा, शुद्ध जीवन जगा आणि खऱ्या सुखाचा अनुभव घ्या!"

## १ जुलै जयंती विशेष

# कृषिक्रांतीचे अग्रदूत: वसंतरावजी नाईक

शेतकरी हा भारतीय समाज व्यवस्थेचा कणा आहे. शेतकरी जगला तरच देश जगेल. शेतकरी व शेतीच्या विकासासाठी त्यांनी जिवाचे रान केले. राजकीय क्षेत्रात त्यांनी सर्वसामान्य माणसाला लोकशाही व्यवस्थेचा अविभाज्य घटक बनविले. व लोकशाहीच्या विकेंद्रीकरणावर भर दिला. "शेतकरी सुखी तर देश सुखी" हा मूलमंत्र उराशी बाळवून त्यांनी शेती उत्पादनात प्रचंड वाढ करण्या साठी समाज हिताचे अनेक निर्णय हाती घेतले. प्रत्येक तरुणाला काम मिळावे. म्हणून कृषिक्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध करून दिल्या. पाणी अडवा, पाणी जिरवा, धवल क्रांती, हरितक्रांती यासारख्या कायमस्वरूपी योजना त्यांनी राबविल्या. 'जर दोन वर्षात राज्याला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण केलं नाही तर शनिवार वाड्यात मला फाशी द्या". असे स्पष्ट पणे बोलणारे हरितक्रांतीचे जनक कै. वसंतरावजी नाईक यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा घेतलेला आढावा.

वसंतराव नाईक यांचा जन्म १ जुलै १९१३ रोजी ता. पुसद मधील गहुली या छोट्याशा खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव फुलसिंग व आईचे नाव होणुबाई होते. त्यांचे कुटुंब सधन होते. त्यामुळे त्यांनी त्या काळामध्ये कायद्याचे शिक्षण शिकले. विदर्भात त्यांनी काही ठिकाणी वकिली केली. १९५९ साली गोरगरिबांना शिक्षण मिळावे, प्रत्येक विद्यार्थी हा शिकलाच पाहिजे. शिक्षण हे सर्वांगीण सुधारणेचे प्रवेशद्वार आहे. कोणीही अज्ञानी, निरक्षर राहू नये हा हेतू मनात ठेवून "जो शिकला, तोच टिकला" या सुभाषिता प्रमाणे त्यांनी वडिलांच्या नावावर पुसद येथे फुलसिंग महाविद्यालयाची स्थापना करून विद्यार्थ्यांना घडवण्याचे पवित्र कार्य हाती घेतले. त्यांच्या कार्याचा ठसा सर्वत्र उमटत होता. म्हणून ते पुसद येथेच पुढील काळात नगराध्यक्ष झाले. पुढे रयतेने त्यांना विधानसभेवर भरघोस मतांनी निवडून दिले. हा त्यांचा राजकीय प्रवास प्रेरणादायी होता. नंतर ते राज्याच्या राजकारणातं सक्रिय झाले. त्याच वेळेस १९५२ ते १९५७ मध्ये मध्यप्रदेश विधान सभेत महसूल मंत्री म्हणून त्यांनी अतिशय उत्कृष्टपणे कार्य केले. तद्नंतर १९५७ ते १९६० मध्ये तत्कालीन द्विभाषिक मुंबई राज्याचे कृषिमंत्री मंत्री म्हणून त्यांची निवड झाली. आवडीचे खाते मिळाले म्हणून त्यांनी अतिशय चांगलं कार्य केले. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. आणि महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य म्हणून निवडून आले. कै. मारोतराव कन्नमवार मृत्यू पावल्या नंतर त्यांची महाराष्ट्राचे चौथे मुख्यमंत्री म्हणून निवड करण्यात आली. त्यांच्या कारकिर्दी मध्ये त्यांनी शेतकऱ्याला अतिशय सन्मानाची वागणूक दिली. १९७२ चा दुष्काळ आठवला की पोटात कळा येऊ लागतात. त्या काळात त्यांनी दुष्काळग्रस्त महाराष्ट्र राज्याचा कारभार अतिशय सचोटीने पाहिला. शेतकऱ्यांना भरभरून मदत केली. शेतकरी सुखी असेल तर आपण सुखी राहु, असे त्यांनी प्रतिपादन केले. एका बाजूला दुष्काळ असला तरी त्यांनी त्या काळात शेतकऱ्यांना अन्नधान्य कमी पडू दिले नाही. ही विशेष बाब सांगावी वाटते. म्हणूनच त्यांना हरित क्रांतीचे जनक म्हणून आज सर्वत्र ओळखले जाते. शिक्षकाचे स्थान समाज व्यवस्थेत महत्त्वाचे आहे. शाळा व शिक्षक यांना सर्वांनी श्रद्धास्थाने मानले पाहिजेत. असे त्यांचे मत होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या मनावर पडलेला होता. त्यामुळे ते ग्राम स्वच्छता, शेतीचा विकास, अज्ञान दूर करणे, सर्वांनी एकत्रित येणे असे अनमोल विचार त्यांनी समाजासमोर ठेवले होते. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री म्हणून बांधा-बांधावर जाऊन त्यांनी शेतकऱ्यांना मदत केली. म्हणून त्यांच्या कार्याचा सुगंध वर्षानुवर्ष दरवळत आहे. त्यांची कीर्ती वाऱ्यासंग जात आहे. सत्य लोप पावत नसते. ते आणखी ही जिवंत आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी चीन, युगोस्लाव्हाकिया अमेरिका अशा अनेक देशाचे यशस्वी दौरे केले. ते पहिले शेतकरी मुख्यमंत्री म्हणून त्यांची गणना केली जाते. समाजसेवेसाठी कार्य करणाऱ्या व्यक्तीला कोणीही विसरू शकत नाही. खरोखरच आपले आयुष्य हे समाजाच्या सेवेसाठीच आहे. म्हणून त्यांनी अहोरात्र परिश्रम केले. त्यामुळेच ते पुढे वाशिम मतदार संघातून १२ मार्च १९७७ मध्ये लोकसभेवर निवडून गेले. महाराष्ट्र सरकारने यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास व मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी येथे त्यांचे नाव देऊन त्यांच्या कार्याचा यथोचित सन्मान केलेला आहे. तसेच त्यांच्या कार्याचे नेहमी स्मरण व्हावे म्हणून १ जुलै रोजी त्यांचा जन्मदिन कृषि दिन म्हणून यापुढे साजरा करण्यात येईल.

असे सांगितले. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळा मार्फत कर्ज योजना सुरू करण्यात आली. 'महानायक वसंत तू' हा त्यांच्या कार्यावर काढलेला चित्रपट अतिशय गाजला. ५ डिसेंबर १९६३ ते २० फेब्रुवारी १९७५ पर्यंत तीन वेळा महाराष्ट्राचे कार्यक्षम मुख्यमंत्री म्हणून नावा रूपाला आले. ते एक महान विचारवंत होते. कृषी क्षेत्रात केलेल्या आमुलाग्र सुधारणेमुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत असे. शेतकरी राजांना त्यांनी कधी ही दूर केले नाही. आजची परिस्थिती आपण पाहत आहोत. शेतीमालाला कवडीमोल भाव दिले जात आहेत. दररोज शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. तरी शेतकऱ्याकडे शासन म्हणावे तेवढे लक्ष देत नाहीत. अशी अवस्था निर्माण झाली आहे. बी-बियाण्याच्या किमतीत भरमसाठ वाढ झाली आहे. शेतीत होणारा खर्च आणि येणारा नफा यांचा ताळेबंद कुठेही जुळताना दिसत नाही. म्हणून तर शेतकरी कर्जबाजारी होत आहेत. कै. वसंतरावजी नाईक यांच्या काळात कोणत्याही ठिकाणी शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या नाहीत. ही विशेष बाब आहे. त्या काळात त्यांनी शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले. त्यामुळेच ते हरित क्रांतीचे जनक झाले. असे आपणाला आज ठामपणाने सांगता येईल. लालबहादूर शास्त्री यांनी जय जवान, जय किसान ही घोषणा दिली होती. जोपर्यंत किसान या देशांमध्ये जिवंत आहे. तो पर्यंत आपल्याला काही कमी पडणार नाही? अशी ती घोषणा होती. आज शेतकरी आंदोलन करीत आहेत, तरी त्या आंदोलना कडे दुर्लक्ष केले जात आहे. ही बाब मनाला खंत वाटणारी आहे. आज धनधान्याला, भाजीपाल्याला, फुले फळांना शेतकऱ्यांच्या योग्य भाव मिळत नाही. ही जबाबदारी कोणाची आहे. का होत आहे असे. जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण झाले असले तरी महाराष्ट्रातला शेतकरी गरीबच राहिलेला आहे. वसंतराव नाईकांचा पुन्हा काळ येईल काय? असे आपल्याला वाटत आहे. शेतकऱ्यावर येणारे सर्व आस्मानी व सुलतानी संकट त्यांनी बाजूला सारले होते. त्यामुळेच त्यांना कृषि संत असेही महाराष्ट्रातील जनता आदराने म्हणत होती. दुष्काळामध्ये केलेल्या कार्याचा आढावा घेऊन तसेच अकरा वर्षे महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री म्हणून वसंतरावजींनी जे कार्य केले त्या कार्याचा यथोचित गौरव करण्यासाठी त्यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी पुरस्कार द्यावा असे जनतेचे मत आहे. हरित क्रांतीचे प्रणेते, कृषि संत, पंचायत राज व्यवस्थेचे जनक, महाराष्ट्राचे थोर नेते कै. मुख्यमंत्री वसंतराव फुल सिंग नाईक यांचा मृत्यू १८ ऑगस्ट १९७९ रोजी सिंगापूर येथे ६६ व्या वर्षी झाला. आज त्यांच्या जयंतीनिमित्त विठू माऊली प्रतिष्ठान खैरकावाडी ता. मुखेड यांच्यावतीने त्यांना विनम्र अभिवादन.

--------------------------------

शब्दांकन
प्रा. बरसमवाड विठ्ठल गणपत
संस्थापक अध्यक्ष: विठू माऊली
प्रतिष्ठान खैरकावाडी ता. मुखेड

शतायुषी हो बाळा..
दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....
आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह
आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

# फुलं नाही, एक झाड आणा – आईच्या नावानं लावा!
## पंचायत समिती सभापती चित्ररेखा चौधरी यांचं अनोखं आवाहन!

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
---------------------








पंचायत समिती, गोरेगावच्या सभापती सौ. चित्ररेखा चौधरी यांनी आपला जन्मदिवस एक वेगळा संदेश देत पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी सर्व मित्र, सहकारी व शुभचिंतकांना "पुष्पगुच्छ न आणता फक्त एक झाड घेऊन या आणि आईच्या नावाने लावा!" असे ठामपणे आवाहन केले आहे. सौ. चित्ररेखा चौधरी यांचा जन्म ०१ जुलै १९८१ रोजी चिरेखनी (ता. तिरोडा) येथे झाला. सध्या त्या गणखैरा पंचायत समिती क्षेत्राचे प्रतिनिधी मधून निवडून आले होते पंचायत समितीच्या सभापती म्हणून कार्यरत आहेत. पर्यावरण रक्षणासाठी आणि भावनिक नात्यांना जपण्यासाठी त्यांनी ही अनोखी संकल्पना पुढे आणली आहे. " माझ्या वाढदिवसाचं खरं गिफ्ट हेच असेल – एक झाड... आणि ते सुद्धा आपल्या मातेच्या नावाने!" असे त्या म्हणाल्या. या उपक्रमाअंतर्गत पंचायत समिती कार्यालयात झाडे लावली जाणार असून, निसर्ग व मातेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा एक आदर्श पायंडा निर्माण केला जात आहे.

# पक्षश्रेष्ठींच्या आदेशावर साक्री नगराध्यक्षांचा राजीनामा!
## 'भाजप एकजुटीचा विजय असो' चा जयघोष; विरोधकांचे मनसुबे उधळले

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------------



साक्री नगरपंचायतीतील सत्तासंघर्ष अखेर भाजप प्रदेशाध्यक्षांच्या मध्यस्थीने मिटला आहे. पक्षश्रेष्ठींच्या आदेशावर नगराध्यक्षा जयश्री पवार, उपनगराध्यक्ष बापू गिते आणि स्वीकृत सदस्य अ‍ॅड. पूनम काकुस्ते शिंदे यांनी राजीनामे सादर केल्याने सत्तेचा पेच सुटला असून, नाराज नगरसेवकांची नाराजीही निवळली आहे. भाजपच्या 'एकजुटीच्या विजयाचा' जयघोष करत एकसंघतेचा संदेश देण्यात आला.

गेल्या काही दिवसांपासून साक्री नगरपंचायतीतील भाजपच्या अंतर्गत वादामुळे राजकीय वारे चांगलेच जोरात वाहत होते. सहा नाराज नगरसेवकांनी नगराध्यक्षा पवार यांच्या कारभारावर नाराजी व्यक्त करत अविश्वास ठराव दाखल केला होता. यामुळे सत्तांतराची शक्यता निर्माण झाली होती. विरोधकांनी संधी साधत आपली मांडणी बळकट केली होती. ४ जुलै रोजी अविश्वास ठरावावर बैठक होणार असताना, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी धोरणात्मक पाऊल उचलत मुंबईत भाजप नगरसेवकांची बैठक घेतली. त्यांनी नाराजांची समजूत काढत वाद मिटवला. यावेळी महसूल मंत्री जयकुमार रावल, आ. अमरिशभाई पटेल, आ. अनुप अग्रवाल, आ. काशिराम पावरा, आ. राजेश पाडवी, भाजपचे नेते व जिल्हा पदाधिकारी उपस्थित होते.

प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी स्पष्ट संदेश दिला की, पक्षाचे आदेश सर्वांना मान्य असले पाहिजेत आणि एकजुटीने सत्ता टिकवली पाहिजे. त्यानुसार नगराध्यक्षांसह उपनगराध्यक्ष व स्वीकृत सदस्यांचे राजीनामे घेण्यात आले. त्यांच्या जागी इच्छुकांना संधी देण्यात येणार असल्याने नव्या नेत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या घडामोडीनंतर विरोधकांचा सत्तेचा डाव फसला असून, भाजपने आपली सत्ता पुन्हा एकदा बळकट केली आहे. सभापती निवडीसाठी प्रक्रिया लवकरच पार पडणार असल्याचेही जाहीर करण्यात आले आहे.

यावेळी उपस्थित भाजप नगरसेवकांनी 'भाजप एकजुटीचा विजय असो!' असा नारा दिला आणि एकसंघतेचे दर्शन घडवले. सत्तासंघर्षाच्या पार्श्वभूमीवर ही भाजपसाठी मोठी राजकीय विजयी ठरली आहे.

# उमेदवारीसाठी 'नामचीन' गुंडांनीही बांधले गुडघ्याला बाशिंग !
## पक्षश्रेष्ठींच्या भूमिकेकडे लक्ष ; सुशिक्षित अन चारित्र्यवान उमेदवारासाठी समाजमन आग्रही

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------




स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आगामी काळात येऊ घातल्या असून त्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग येऊ लागला आहे. महापालिका आणि पंचायत समिती, जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत नशीब आजमावण्यासाठी आतापासूनच इच्छुकांची मोर्चे बांधणी सुरू झाली आहे. यामध्ये राजकीय मातब्बरांसोबतच विशेषतः शहरातील आणि ग्रामीण भागातील 'राजाश्रय ' असलेल्या नामचीन गुंडांनी देखील गुडघ्याला बाशिंग बांधल्याने तो एक चर्चेचा विषय ठरला आहे. काही विशिष्ट पक्षांकडे या मंडळींचा होरा असून उमेदवार निवडतांना संबंधित पक्षाच्या नेत्यांची डोकेदुखी वाढणार आहे. गेल्या अनेक दिवसापासून बहुचर्चित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर मोकळा झाला आहे. राजकीय जाणकारांच्या मतानुसार दिवाळीच्या नंतर धुळे महापालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका होतील असा कयास बांधला जात आहे. त्या पार्श्वभूमीवर धुळे जिल्ह्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. या निवडणुकांमध्ये नशीब आजमावण्यासाठी हौसे, नवसे आणि गौसे आतापासूनच कामाला लागले आहेत. अनेकांनी तर गुडघ्याला बाशिंग बांधले आहे. त्यातील काही अतिउत्साही जणूकाही नगरसेवक असल्याच्या अविर्भावात फिरू लागले आहेत. वेगवेगळ्या कार्यक्रमाचे निमित्त शोधून लावल्या जाणार्या होर्डिंगवर स्वतःच्या नावापुढे भावी नगरसेवक लावण्यापर्यंत काहींची मजल पोचली आहे. यामध्ये विशेषतः काही नामचीन गुंडांचा देखील समावेश आहे. गेल्या काही वर्षांमध्ये गुन्हेगारी घटनांमध्ये ज्यांचा सहभाग राहिला आहे, पोलीस दप्तरी ज्यांची नोंद झाली आहे आणि गुन्हेगारी घटनांमधून दोन नंबरच्या धंद्यांमधून ज्यांनी काळी माया जमविली आहे ते आता राजकीय आखाड्यात उतरून 'नेतेगिरी' करण्यासाठी सज्ज झाले आहे. आपल्याला कुठल्या पक्षाच्या माध्यमातून नगरसेवक, पंचायत समिती सदस्य किंवा जिल्हा परिषद सदस्य होता येईल याचे प्लानिंग त्यांनी सुरू केले आहे. त्या दृष्टीने संबंधित पक्षाच्या 'गॉडफादर'च्या मागेपुढे ही मंडळी फिरू लागली आहे. राजकारण्यांना देखील 'मसल पावर' असणारी अशी मंडळी लागत असल्याने त्यांनी देखील वेगवेगळ्या भागातील नामचीन गुंडांना आतापासून 'चॉकलेट' देऊन ठेवले आहे. त्यामुळे संबंधितानी आतापासूनच आपले मतदारसंघ निश्चित करून त्यामध्ये अप्रत्यक्ष प्रचाराचे काम सुरू करून टाकले आहे. एकेका वार्डामध्ये एकाच पक्षाकडून अनेक इच्छुक दंड थोपटत असल्याने तो देखील चांगलाच चर्चेचा विषय ठरला आहे. काही लोक तर अशा बाशिंग बांधलेल्यांना भावी नगरसेवक संबोधून फिरकी देखील घेऊ लागले आहेत. मात्र जनमताचा कानोसा घेतला असता राजकीय प्रतिनिधी हे सुशिक्षित समंजस आणि विधायक दृष्टी अणि विकासाची जाण असणारे, चारित्र्यसंपन्न हवेत. विविध राजकीय पक्षांनी देखील उमेदवारांची निवड करतांना, त्याचे चारित्र्य, समाजातील त्याला असणारी मान्यता या गोष्टी लक्षात घ्यायला हव्यात. अशी समाजातील जाणकारांनी अपेक्षा आहे.

गुंडाना 'राजाश्रय' लोकशाहीचे अवमूल्यन !

राजकारणाची गरज म्हणून जर गुंड लोकांना उमेदवारी देऊन 'राजाश्रय' दिला जात असेल तर ते राजकीय व्यवस्थेचे नव्हे तर लोकशाहीचे अवमूल्यन ठरेल, अशी भूमिका मांडली जात आहे. एवढेच नव्हे तर अशाप्रकारे गुन्हेगारी प्रवृत्ती असणार्या लोकांना जो पक्ष उमेदवारी देईल त्या पक्षाला मतदान करू नये अशा पद्धतीची चर्चा देखील जनसामान्यांमध्ये व्हायला लागली आहे. राजकारणाचे वाढते गुन्हेगारीकरण रोखायचे असेल तर सर्व पक्षांच्या नेत्यांनी या मुद्यावर गांभीर्याने विचार करून आपल्या पक्षाच्या माध्यमातून सुशिक्षित आणि चारित्र्यवान उमेदवार दिले जातील याबाबत दक्ष राहणे आवश्यक आहे. तरच खर्या अर्थाने लोकशाही जिवंत राहण्यास मदत मिळेल असे सध्याचे समाजमन आहे.

# " पर्यटन " साठी नवीन सदर सुरू करूया
## चिवटीबारी दंडकारण्यातील मनमोहक पर्यटन







चिवटीबारी हे स्थान धुळे जिल्ह्यातील साक्री तालुका व नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्याच्या सीमेवरील पश्चिम टोकावर असून मौसम नदी व पांझरा नदी यांच्या उगमस्थानाला लागूनच असून, पर्यटनदृष्ट्या अतिशय आकर्षक स्थान आहे, पुरातन काळापासून चिवटी बारी हे स्थान दंडकारण्याचा भाग आहे, येथील नैसर्गिक प्रेक्षणीय स्थळांचा आपणास आनंद घेता येतो, तेथील पर्वतातील विलोभनीय धबधबे,



डोंगर दर्या यांचा नैसर्गिक देखावा अगदी मनमोहक असून निसर्गाचे सौंदर्य पावसाळ्यामध्ये अगदी खुलून दिसते, धुळे जिल्ह्यातील दक्षिण पश्चिम या टोकाला तसेच गुजरात व नाशिक जिल्ह्याच्या सिमेवर असलेली चिवटीबारी पूर्वी कोणतेही रस्ते नसल्यामुळे फारसे परिचित नव्हते परंतु आता पीडब्ल्यूडी विभागाने पुढाकार घेऊन अतिशय चांगले रस्ते करून दिले व त्याच बरोबर वनविभाग व पर्यटन विभागाने पुढाकार घेऊन तेथे पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी तटबंदीची सोय केली आहे, अनेक पर्यटक ट्रेकिंग साठी विजयपूर पासून ते बोराटे पर्यंत ट्रेकिंग करतात, तेथील मनमोहक असे उंच उंच नैसर्गिक धबधबे पर्यटकांचे लक्ष वेधून घेतात, तसेच तेथे पुरातन काळापासून भगवान परशुरामांचे वास्तव्य होते, त्यांचे एक छोटेखानी मंदिरही चिवटीबारी मध्ये आहे, भगवान परशुराम हे महाभारतातील पितामह भीष्म व कर्ण यांचे गुरु होते, असे महान तपस्वी परशुरमांचे पुरातन काळातील शौर्य व कार्याकडे पाहता या मंदिराचे व परिसराचे विकास होणे गरजेचे आहे, नाशिक व धुळे जिल्ह्यातील पीडब्ल्यूडी विभागाने आता अतिशय सुंदर असे रस्ते करून दिल्यामुळे चिवटीबारीचे दडलेले निसर्गसौंदर्य पर्यटकांना खुले झाले आहे, पावसाळ्यामध्ये येथील धबधबे, डोंगर, दऱ्या व पावसाचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांची झुंबड या ठिकाणी पहावयास मिळते, अगदी रामायण कालखंडापासून या दंडकारण्यामध्ये अनेक ऋषी, मुनी, देव, दानव, साधू, संत यांचे वास्तव्य या भागात आढळून आलेले आहे, चिवटी बारी हे स्थान सह्याद्रीच्या उपरांगांमध्ये असून, चिवटी बारी ला लागूनच असलेल्या पर्वतांमध्ये पांझरा आणि मोसम या प्रसिद्ध नद्यांचा उगम होतो तेथील शेंदवड भवानी चे मंदिरही फार आकर्षक असून पर्यटकांची व ट्रेकर्स लोकांची अलोट गर्दी पहावयास मिळते, चिवटी बारी पासून अगदी ३५ किलोमीटरवर गुजरात मध्ये माता शबरी चे मोठे मंदिर आहे, आणि जवळच असलेल्या पंपा सरोवरला गौतम मुनी (माता शबरी यांचे गुरु व महान तपस्वी) यांचा चा आश्रम रामायण पूर्वकाळात होता, याच मार्गे भगवान श्रीराम हे मातासितेचा शोध घेण्यासाठी जात असताना माता शबरीची भेट झाली , त्याच पर्वतरांगांमध्ये जवळच मांगीतुंगी या पर्वतांमध्ये पुरातन ग्रंथांच्या उल्लेखानुसार वानर राज सुग्रीव व बाली यांचे वास्तव्य होते, आजही चिवटी बारी मध्ये सुग्रीव व बाली यांचे वंशज वानर मोठ्या प्रमाणामध्ये आढळून येतात, चिवटी बारी मधील भगवान परशुरामांच्या मंदिराजवळील भागामध्ये अनेक पर्यटक वानरांना मोठ्या प्रमाणात खाऊ, खाद्य घेऊन जाताना दिसतात, तसेच अगदी चिवटीबारी पासून ७ ते ८ किलोमीटर वर नाशिक जिल्ह्यामध्ये मुल्हेर किल्ला, हरणबारी धरण तसेच २५ किलोमीटरवर साल्हेर किल्ला असून या भागाला पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्व आहे, त्याचप्रमाणे चिवटी बारी पासून ३० ते ३५ किलोमीटरवर डांगशिरवाडे कूडाशी मार्गे आमळी येथे भगवान कन्हैयालाल महाराजांचे (श्री विष्णू चे) पुरातन मंदिर आणि प्रसिद्ध असा आलालदरी धबधबा आहे, त्याचप्रमाणे चिवटी बारी ला लागूनच असलेल्या पर्वतांमध्ये पांझरा आणि मोसम या प्रसिद्ध नद्यांचा उगम होतो, तेथील शेंदवड भवानी चे मंदिरही फार आकर्षक असून शेंदवड पर्वतामध्ये पांझरा नदीच्या उगमस्थानी स्वयंभू भवानी माता प्रकट झालेली असून उगमस्थानी असलेल्या भवानी मातेच्या दर्शनासाठी व पर्यटनासाठी तिथे सुद्धा पर्यटकांची व ट्रेकर्स लोकांची अलोट गर्दी होते,आजूबाजूला या पर्यटन क्षेत्रांना जोडणारा चिवटी बारी रस्ता पीडब्ल्यूडीने करून दिला त्यामुळे या भागाला फारच महत्त्व प्राप्त झालेले आहे, प्रत्येकाने चिवटी बारीचे पावसाळ्यामधील मनमोहक वातावरणामध्ये एकदा तरी निश्चितच भेट द्यावी आणि निसर्गाच्या सानिध्यातील चिवटीबारीचा व तेथील निसर्ग दृश्यांचा मनसोक्त आनंद घ्यावा असे मला वाटते.

संकलन
किशोर सोनवणे
दैनिक स्वराज्यदूत

# श्री छत्रपती शिवाजी वाचनालयाच्या नवनियुक्त संचालक मंडळ व पदाधिकाऱ्यांचा साक्री तालुका म.से. सं.निसर्ग मित्र, ग्राहक पं.व प्रवासी महासंघ यांच्या वतीने सत्कार

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------





साक्री येथील श्री. छ.शिवाजी वाचनालयाच निर्वाचित संचालक मंडळ व अन्य नव नियुक्त पदाधिका-यांचा साक्री तालुका मराठा सेवासंघ, निसर्ग मित्र समिती, ग्राहक पंचायत व प्रवासी महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने हृद्य सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य बी.एस.पाटील हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून, हस्ती बँकेचे चेअरमन व प्रवासी महासंघाचे उपाध्यक्ष डाॅ.दिलीप चोरडिया व म.से.संघ, ग्राहक पंचायत व निसर्ग मित्र समीतींचे साक्री तालुका अध्यक्ष प्राचार्य बी.एम भामरे हे होते.

या प्रसंगी छ.शिवाजी वाचनालयाच्या निवडणुकीत निवडुन आलेल्या पदाधिका-यांत उपाध्यक्ष सुरेश सोनवणे, सहकार्यवाह एड.नरेंद्र मराठे, संचालकांत प्रा.नरेंद्र तोरवणे, विजय भोसले, डी.एन.खैरणार, डाॅ.प्राचार्य लहु पवार, , पी.झेड.कुवर, आर.पी.भामरे, तसेच साक्री तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन ऋतुराज ठाकरे व साक्री तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष विलास देसले यांचा प्राचार्य बी.एस.पाटील व विविध मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, भारताचे संविधान, जिजाऊ ब्रिगेड च्या पहिल्या ग्रामीण महा अधिवेशनाची स्मरणिका व बुके देवुन सत्कार करण्यात आला.

आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य बी.एस.पाटील यांनी विविध सामाजिक संघटनांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या सत्कार समारंभाच्या आयोजना बद्दल,या संघटनांचे तालुकाध्यक्ष प्राचार्य बी.एम.भामरे यांचे अभिनंदन केले व सत्कार मूर्तींना शुभेच्छा दिल्यात. तसेच या सत्कार सोहळ्याच्या निमित्ताने आयोजक प्राचार्य बी.एम. भामरेंनी व्यक्त केलेल्या साक्री तालुक्याच्या विकासाभिमुख दूरगामी विचारांच्या कार्यवाहीसाठी तालुक्यातील समाजसेवी मंडळीना एकत्र आणण्याच्या कार्यवाहीला सुरुवात करण्याचे सूतोवाच केले.

आपल्या सत्काराला उत्तर देतांना प्रा.नरेंद्र तोरवणे यांनी तालुक्याच्या सार्वत्रिक समस्यांवर उपाय योजनेसाठी जनतेने संघटीत होवुन आंदोलनात्मक पवित्रा घेतला तरच मार्ग निघतो याची उदाहरणे देत जनआंदोलनांसाठी तालुक्यातील जनतेने एकत्र येण्याचे आवाहन केले.या प्रसंगी ऋतुराज ठाकरे व डाॅ दिलीप चोरडिया यांनीही यथोचित मनोगते व्यक्त केलीत.

रविवारी साक्री येथील शेतकी संघ आवारातील म.से.संघ संचलित धुळे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेच्या कार्यालयात संपन्न झालेल्या या सत्कार सोहळ्याचे आयोजक प्राचार्य बी.एम भामरे यांनी आपल्या प्रास्ताविकात हा सत्कार सोहळा आपल्याच स्नेहीजनांचे कौतुक करण्याचा, त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा देण्याचा, त्यांनी भविष्यात आमच्या विविध सामाजिक संघटनांना पाठबळ देण्याचे आवाहन करण्याचा व या निमित्तानेच सा-या सत्कार मुर्तींनी तालुक्याच्या सामाजिक प्रश्नांवर एकत्र येवुन वेळोवेळी तोडगा काढण्याचे आवाहन करण्यासाठी आयोजित केला असल्याचे नमुद करत सर्वांचे अभिनंदन केले.

एम.टी.ठाकरेंनी अतिशय सुंदर सूत्रसंचालन केलेल्या या सत्कार सोहळ्यास चारही संघटनांच्या पदाधिका-यांत -निसर्ग मित्र समितीचे तालुका उपाध्यक्ष श्री संजय बच्छाव, माजी सरपंच दिनेश बोरसे, मराठा सेवा संघाचे दीपक नांद्रे, श्यामकांत साळुंखे, , डाॅ.अजय नांद्रे, प्रवीणमोरे भाऊसाहेब, डाॅ.मनीषा पाटील व,बबीता देवरे यांची उपस्थिती व सहकार्य लाभले.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# वनपरिक्षेत्र विभागाकडून अवैध रेती वाहतूक करणारे ट्रॅक्टर जप्त

सोमनाथ घोगांणे
नांदगांव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------



नांदगाव वनपरिक्षेत्र विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी कोकाटे यांची नव्यानेच नांदगाव येथे नियुक्ती झाली असून त्यांनी पहिल्याच झटक्यामध्ये अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई केल्याने खळबळ उडाली आहे .तालुक्यात गत महिनाभरापासून पाऊस चालू आहे त्यामुळे नदी नाल्यांना काही भागातून पाणी साचलेले आहे .काही भागात पाणी झुळझुळ वाहत आहे .त्यातच पहिल्याच पावसामध्ये जेमतेम आलेल्या रेतीची चोरी करून अवैद्य वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरचालकांवरती कारवाई केल्याने अवैद्य रेती गौण खनिज वाहणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.तालुक्यातील मूळ डोंगरी भागामध्ये मन्याड नदी पात्रातून अवैधवाळू चोरी च्या नियमित तक्रारी होत असायच्या परंतु गेल्या तीन चार महिन्यांमध्ये सध्या या संदर्भातल्या वाळू अवैध्य प्रकरणाच्या कोणत्याही तक्रारी उपलब्ध नव्हत्या परंतु पावसाळा सुरू होताच अवैद्य खनिजाची चोरी होण्याचं काम सुरू झाले आहे.आता इथून पुढे वनपरिक्षेत्र विभाग आणि त्याशी संबंधित असणाऱ्यांना जागरूकता बाळगावी लागणार आहे.

नांदगाव वन विभागाने केलेल्या कामगिरी मध्ये तालुक्यातील रणखेडा बिरोळे हद्दीमध्ये अवैद्य वाळू उपसा करणाऱ्या चार ट्रॅक्टर धारकांना कारवाई करण्यात आली असून सदरचे चार वाहने वन विभागाने ताब्यात घेतले आहे या संदर्भात नांदगाव वन विभागाकडून अवैद्य वाळू प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी ट्रॅक्टर मालक यांचा शोध घेऊन त्यांच्यावर प्रतिबंध कायदेशीर कारवाई करण्यासाठी तपास सुरू झाला आहे सदर मुद्देमाल ट्रॅक्टर ट्रॉली चार सहित नांदगाव येथे सदर वाहने जप्त करण्यात आली आहे संशयित आरोपी यांच्या विरोधात भारतीय अधिनियम वन अधिनियम १९२७ चे कलम २६ आय ड जी ४१ / ५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून ट्रॅक्टर मालक यांचा शोध घेणे चालू आहे सदरील तपास सहाय्यक वनरक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली नांदगाव परिक्षेत्र अधिकारी एच बी कोकाटे वनपरिक्षेत्राधिकारी नांदगाव न्यायडोंगरी मंडल विभागाचे एम एम राठोड हे करीत आहे नांदगाव वनपरिक्षेत्र तील विष्णू राठोड , नवनाथ बिन्नर ,अमोल पाटील ,संजय बेडवाल ,अमोल पवार ,रवींद्र शिंदे, समाधान सोनवणे ,विशाल , मनीषा पाटील अण्णा टेकनर ,विजय , संतोष दराडे आदी कर्मचाऱ्यांनी या मोहीने मध्ये सक्रिय सहभाग नोंदवून अवैद्य वाळू चोरून गौण खनिजाची चोरी करणाऱ्या चार ट्रॅक्टर यांना ताब्यात घेतले आहे.

# अजब आदिवासी विकास विभागाचा..गजब कारभार

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



दिनांक १६/०६/२०२५ रोजी संपुर्ण महाराष्ट्रात आदिवासी विकास विभागामार्फत चालविल्या जाणा-या शासकीय आश्रम शाळा व अनुदानित आश्रम शाळा मध्ये गाजावाजा करत प्रवेश महोत्सव साजरी करण्यात आला. एक दिवसाच्या कार्यक्रमासाठी शाळा पातळीवर आटापिटा केल्या निवासी आश्रम शाळेत अजुन ही विद्यार्थी आले नाही. काही अनुदानित आश्रम शाळा बंद अवस्थेत आहेत. महिनाभर ही विद्यार्थी आले नाही तरी अनुदान कमी होणार नाही. शासकीय आश्रम शाळेत काही वर्गात शिक्षकच नाही तर विद्यार्थी शिक्षणाचे धडे कधी शिकतील. शासन म्हणत आम्हांला गुणवंत शिक्षक भरायचे आहेत तो पर्यंत आमच्या मुलांनी वर्गात बसुन दिवस मोजायचे का ? आश्रम शाळेत कोण किती कसा काम करतो हे सगळ्यांना माहीत आहे. १०० टक्के निकाल लागल्यावर ही मंत्री महोदय म्हणतात. आमच्या मुलांची गुणवत्ता दिसुन येत नाही. मग आदिवासी मुलांच्या शिक्षणावर विशेष लक्ष देणारे आदिवासी आश्रम शाळा व नामांकित शाळा जिथे आदिवासी विद्यार्थी शिकतात तिथे शाळा प्रवेश उत्सव साजरे करणारे महाराष्ट्र राज्याचे कर्तव्य तत्पर आदिवासी विकास मंत्री प्राध्यापक डॉक्टर अशोक उईके यांनी नगर जिल्ह्यातील नामांकित शाळा संत ज्ञानेश्वर इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा दहाव्या वर्गाचा २०२५ चा निकाल राजूरच्या प्रकल्प अधिकाऱ्याने माननीय मंत्री महोदयांना कळवला नाही, असे वाटते..!

या नेवासा तालुक्यातील भानस हिवरे या गावातल्या या नामांकित शाळेत दहाव्या वर्गाच्या परीक्षेत प्रविष्ट झालेल्या व तेथेच शिक्षण घेतलेल्या ११७ आदिवासी विद्यार्थ्यांपैकी ११४ विद्यार्थी २०२५ च्या परीक्षेत नापास झाल्याची बातमी नापास झाल्याची माहिती मिळाली. यावर आदिवासी विकास मंत्री महोदय काही कार्यवाही करणार का ? शासकीय आश्रम शाळेची गुणवत्ता ढासाळलेली दिसते मग नामांकित शाळेची गुणवत्ता का ? दिसत नाही. असे अनेक समस्या असतांना आदिवासी विद्यार्थ्यांचा शोषण करणारे मंत्री पासुन अधिकारी ते कर्मचारी करत आहेत. प्रवेश महोत्सव खुप उत्सवात साजरी केला. आज शाळा सुरू होऊन १०/११ दिवस झाले.काही वर्गात शिक्षक विना विद्यार्थ्यांना वर्गात बसावे लागत आहे. एक ही लोक प्रतिनिधी अथवा पालक जाब विचारायला तयार नाहीत. ही खुप मोठी शोकांतिका आहे. मंत्री महोदयांना विद्यार्थ्यांची काळजी असती तर पहिल्या दिवसापासून शिक्षक रोजंदारी का होईना हजर केले असते. होणा-या विद्यार्थ्यांच्या नुकसानास जबाबदार कोण आदिवासी विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळा-या आदिवासी विकास विभागाचा व मंत्र्यांच्या निष्काळजीपणामुळे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प धुळे अंतर्गत चालविल्या जाणा-या शासकीय आश्रम शाळा व अनुदानित आश्रम शाळेत १६/१७ दिवस शाळा सुरु झाले तरी विद्यार्थी शाळेत निवासी राहायला आले नाही.प्रकल्प कार्यालय व आदिवासी विकास विभागातील अधिकारी शांत बसुन आदिवासी विद्यार्थ्यांचे नुकसान करत आहेत. गणेश गावित.. धुळे जिल्हा प्रमुख महाराष्ट्र राज्य आदिवासी बचाव अभियान तानाजी बहिरम, सामाजिक कार्यकर्ता, पिंपळनेर

# दारू विक्रेत्यांवर धडक कारवाई होणार! विटाई गावात पोलिसांचे पथक दाखल

## दैनिक स्वराज्यदूत च्या वृत्तामुळे प्रशासनाला जाग आली

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



"विटाई गावातील अवैध दारू विक्रीच्या विरोधात एल्गार पुकारणाऱ्या तरुणांना व ग्रामस्थांना अखेर यश आले असून. दैनिक स्वराज्यदूत च्या वृत्तामुळे प्रशासनाला जाग येत विटाई गावात दारूबंदी पोलीस पथक दाखल होत आहे. गावातील माता-भगिनींच्या व तरुण बांधवांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत आहे". गेल्या अनेक वर्षापासून गावात यशस्वीपणे दारूबंदी पाळली जात होती. मात्र मागील दोन महिन्यापासून काही व्यक्तींनी पुन्हा दारू विक्री सुरू केल्याने, ग्रामस्थ व तरुण बांधव संतप्त झाले. गावातील तरुणांनी यास विरोध करत पत्रकार बांधवांना बोलवत गावातील तरुणांची वेसनादीकडे चाललेली वाटचाल व आया बहिणींचे घरात होणाऱ्या हाल पत्रकार बांधवांन समोर सत्य घटना मांडली व तुमच्या लेखणीतून प्रशासनाला जागे करा असे गहाणे मांडलेयानंतर दैनिक स्वराज्यदूत, दैनिक सह्याद्रीचा राखणदार या वृत्तपत्रात


"दारुविक्रीला आळा घाला अन्यथा साक्री पोलीस ठाण्यावर मोर्चा !" - विटाईतील तरुणांचा एल्गार
श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत


बातमी झळकली आणि प्रशासनाला जाग आली. साक्री पोलीस ठाण्याचे अधिकारी बागुल, उप सहाय्यक प्रसाद रौंदळ, तसेच महिला पोलीस कर्मचारी यांच्या पथकाने तातडीने विटाई गावात गस्त सुरू केली. यामुळे गावात पुन्हा एकदा दारूबंदीला आळा बसेल असे ग्रामस्थांना संकेत दिसू लागले आहेत.गावातील तरुण बांधवांनी यापूर्वी स्पष्ट इशारा दिला होता की जर विटाई गावात दारूबंदी झाली नाही, तर साक्री पोलीस ठाण्यावर एल्गार मोर्चा काढण्यात येईल. त्या पार्श्वभूमीवर ही हालचाल अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. पोलीस प्रशासनाने नागरिकांच्या भावना लक्षात घेत तात्काळ गस्त सुरू केल्याने अवैध दारू विक्रेत्यांवर आळा बसेल व लवकरच धडक कारवाई होण्याची शक्यता वर्तवली आहे. दारूबंदी पथकाने गावात गस्त सुरू केल्यामुळे गावातील तरुण बांधवांनी व नागरिकांनी पोलीस प्रशासनाचे आभार मानले.

# नांदगाव राष्ट्रवादी कॉंग्रेसला खिंडार

## माजी नगरसेवक वाल्मीक टिळेकर यांचा शेकडो समर्थकासह शिवसेनेत प्रवेश

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------



नांदगाव नगरपालिकेचे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे माजी नगरसेवक वाल्मीक टिळेकर यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. भुजबळांचा कट्टर समर्थक मानला जाणारा नांदगाव शहरातील प्रभाग क्रमांक एक मधील महाजन वाडा तील सर्व रहिवाशी नागरिकांनी माजी नगरसेवक वाल्मीक भाऊ टिळेकर यांच्या निर्णया सोबत राहून शिवसेना पक्षात प्रवेश केला .

आ. सुहास कांदे व सौ अंजुमताई कांदे यांच्या उपस्थितीत सर्वांचा पक्षप्रवेश सोहळा संपन्न झाला.

यावेळी बोलताना वाल्मीक टिळेकर यांनी मागील दहा वर्षांपासून माजी आमदार सोबत काम केले पण अपेक्षित कामी झाली नाहीत आणि आमदार सुहास कांदे यांची कार्यपद्धत आधीपासूनच आवडत होती आता सर्व समर्थकांकडून आम्ही हा निर्णय घेतला आहे यापुढे आम्ही अण्णांसोबत विकास कामांच्या सोबत आहोत असे मत व्यक्त केले.

याप्रसंगी वाल्मिक टिळेकर यांना नांदगाव तालुका संघटक पदाची जबाबदारी देण्यात आली. सोबतच गणेश पंडित सोमासे यांची युवा सेना विभाग प्रमुखपदी , शरद तुळशीराम महाजन यांची युवा सेनेच्या नांदगाव शहर उपाध्यक्षपदी, सतीश परशुराम महाजन यांची युवा सेनेच्या शहर सहसंघटक पदी, तर डॉ. वाल्मीक भास्कर महाजन यांची शिवसेना नांदगाव शहर संघटक पदी नियुक्ती करण्यात आली.

याप्रसंगी शिवसेना शहर प्रमुख सुनील जाधव यांनी सूत्रसंचालन केले तर अमोल शेठ नावंदर यांनी सर्व प्रवेश करणाऱ्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे शिवसेना पक्ष स्वागत केले.या प्रसंगी दत्तात्रय महाजन, प्रवीण टिळेकर,सुदाम महाजन, समाधान आहेर, सचिन सोमासे, नागेश सोमासे, नितीन वाघ, अशोक निकम ,अशोक पैठणकर, बबन इप्पर, गंगाधर जाधव, मधुकर खैरनार, गणेश पाटील, रवींद्र सोनवणे, परशुराम जाधव, नारायण सोनवणे,नवनाथ गोजरे, मच्छिंद्र टिळेकर, विकास टिळेकर, महेश टिळेकर, किरण टिळेकर, कमलेश टिळेकर, गोरख सरोदे, राज सरोदे, रोहिदास वाघचौरे, सौरभ पैठणकर, यशवंत चौगुले, हिरामण हातेकर, अमोल भावसार, बाळू रोकडे, मनोज मोरे, मनोज गवळी, निवृत्ती आहेर, अनिल सावंत,नवनाथ गोदरे, मनोज निकम, सुभाष चौधरी, मनोज मोरे, मनोज गवळी, किरण आहेर, प्रदीप आहेर महिलांमध्ये योगिता महाजन , सुरेखा सोमासे, पुनम सोमासे,ज्योती टिळेकर, दिपाली टिळेकर, मनीषा खैरे, ज्योती शिंदे, स्वप्नाली गोदरे, मनीषा चौधरी, चंद्रकला सोनवणे, मंदाबाई सोनवणे, दिपाली आहेर, प्रियंका सूर्यवंशी, पूनम सोमासे, राणी सोनवणे, सुनीता सदाफुले, पूजा सावंत, कल्पना गायकवाड, वंदना इप्पर,मयुरी गवळी, गायत्री गोसावी, शितल आहेर, नीता गवळी, पाटील मॅडम, अक्षदा आढाव, मनीषा वाघ इत्यादी शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते

# कवी गझलकार अजय बिरारी जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------




मनु मानसी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आणि महावीर इंटरनॅशनल नाशिक यांच्या संयुक्त विद्देमाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय बहुचर्चित मानाच्या बहुमानांकित सर्वत्र चर्चेत असलेला यंदाच्या सत्तर जीवन गौरव पुरस्कारांमध्ये मानकरी ठरले बागलाण तालुक्यातील आसखेडा येथील रहिवासी सध्या उद्योग व्यवसाया निमित्ताने नाशिक येथे स्थाईक असलेले कवी लेखक गझलकार दादासो अजय बिरारी यांना रविवार दिनांक २९ / ०६ / २०२५ रोजी नाशिकच्या कर्मभूमीत द पवार गार्डन येथे मा. डॉ. शेफालीताई भूजबळ चिफ ॲडमिस्ट्रेटर भूजबळ कॉलेज नाशिक, मा. श्री सुनिल पवार पोलिस निरिक्षक क्राईम पंचवटी पो. स्टे. , मा. श्री एम. आर. डावरे डायरेक्टर लायन्स क्लब ऑफ नाशिक शहर , मा. डॉ. विठ्ठलसिंग ढाकरे . प्राध्यापक हिंदी विभाग अध्यक्ष, मा. महंत श्री डॉ. भक्ति चरणदासजी महाराज अ. भा. आखाडा परिषद राष्ट्रीय प्रवक्ते यांचे हस्ते व संस्थेच्या संस्थापिका सौ. मेघा शिंपी, कार्याध्यक्ष श्रीमती मंजुताई जाखाडी, मा. डॉ. अनिल नहार अध्यक्ष महावीर इंटर नॅशनल यांच्या उपस्थितीत, शेकडो साहित्यिकांच्या टाळ्यांच्या गजरात जीवन गौरव पुरस्कार २०२५ देऊन गौरविण्यात आले. अजय दादांना या आधीही अनेक मानाच्या संस्थांचे राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत. अजय दादांचा गौरव हा साहित्याचा गौरव , समाजाचा गौरव असे अशा प्रतिक्रिया साहित्य क्षेत्रात उमटत आहेत. विशेष म्हणजे वयाच्या सहासष्ठीत जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याने साहित्य क्षेत्रातून सर्वत्रआनंद व्यक्त होत आहे. त्यांचे गावकुसाचे मित्रवर्य गावगाडाकार साहेबराव नंदन तात्यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

# साहेबराव नंदन तात्या जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

------------------------




मनु मानसी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आणि महावीर इंटरनॅशनल नाशिक यांचा संयुक्त विद्देमाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय बहुचर्चित मानाचा बहुमानांकित सर्वत्र चर्चेत असलेला यंदाचा जीवन गौरव पुरस्काराचे मानकरी ठरले बागलाणभूषण ताहाराबादचे रहिवासी सध्या उद्योग व्यवसाया निमित्ताने नाशिक येथे स्थाईक असलेले गावगाडाकार कवी लेखक तात्यासो साहेबराव नंदन यांना रविवार दिनांक २९ / ०६ / २०२५ रोजी नाशिकच्या कर्मभूमीत द पवार गार्डन येथे मा. डॉ. शेफालीताई भूजबळ चिफ ॲडमिस्ट्रेटर भूजबळ कॉलेज नाशिक, मा. श्री सुनिल पवार पालिस निरिक्षक क्राईम पंचवटी पो. स्टे. , मा. श्री एम. आर. डावरे डायरेक्टर लायन्स क्लब ऑफ नाशिक शहर , मा. डॉ. विठ्ठलसिंग ढाकरे . प्राध्यापक हिंदी विभाग अध्यक्ष, मा. महंत श्री डॉ. भक्ति चरणदासजी महाराज अ. भा. आखाडा परिषद राष्ट्रीय प्रवक्ते यांचे हस्ते व संस्थेच्या संस्थापिका सौ. मेघा शिंपी, कार्याध्यक्ष श्रीमती मंजुताई जाखाडी, मा. डॉ. अनिल नहार अध्यक्ष महावीर इंटर नॅशनल यांच्या उपस्थितीत, शेकडो साहित्यिकांच्या टाळ्यांच्या गजरात जीवन गौरव पुरस्कार २०२५ देऊन गौरविण्यात आले. नंदन तात्यांना या आधीही अनेक मानाच्या संस्थांचे राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत. साहेबराव तात्यांचा गौरव हा साहित्याचा गौरव , समाजाचा गौरव असे अशा प्रतिक्रिया साहित्य क्षेत्रात उमटत आहेत. विशेष म्हणजे वयाच्या बासष्टीत चौथा जीवन गौरव पुरस्कार घेणारे बागलाण मधुन पहिलेच साहित्यिक असावेत अशा चर्चा पुरस्कार सोहळ्यात रंगत होत्या.